अवतीभवती

वृद्धेचे ४७ हजारांचे सोन्याचे दागिने लंपास

बीड : पारगाव (जि. धाराशिव) येथून बीडकडे एसटी बसने प्रवास करणाऱ्या एका ६४ वर्षीय वृद्ध महिलेच्या बॅगेतून अज्ञात चोरट्याने ४७,३४० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी बीड शहरातील शिवाजीनगर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी सुनंदा रामचंद्र जोशी (रा. अंकुश नगर, बीड) या १४ मे २०२६ रोजी सायंकाळी पारगाव येथून अक्कलकोट-गेवराई बसमध्ये बसल्या होत्या. बीड शहरातील धांडे नगर पाटीजवळ येईपर्यंत त्यांच्या मोठ्या बॅगेतील छोट्या पर्समध्ये ठेवलेले दागिने सुरक्षित होते. मात्र, त्यानंतर बस सरकारी दवाखान्याच्या स्टॉपवर आली असता त्या नातवंडांसह खाली उतरल्या. घरी गेल्यावर पाहिले असता पर्ससह सोन्याचे साखळीचे गंठण, पट्टीचे गंठण, मणी मंगळसूत्र आणि लंबोळे सर मणी गायब होते.

ब्रह्मगावात धार्मिक स्थळी विटंबना

बीड : गेवराई तालुक्यातील ब्रह्मगाव येथे एका धार्मिक ठिकाणी मूर्तीची विटंबना केल्याचा प्रकार उघडकीस आल्याने परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. चकलांबा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील या घटनेमुळे गावात तणावपूर्ण शांतता आहे. गुरुवारी पहाटे अज्ञात विकृतांनी विटंबना केल्याचे गावकऱ्यांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी अज्ञात व्यक्तींवर गुन्हा दाखल केला आहे.

महावितरण कर्मचाऱ्यावर हल्ला; गुन्हा दाखल

बीड : वंजारवाडी येथे महावितरण कर्मचारी जगदीश विठ्ठल कुटे (वय ३६, रा. वंजारवाडी, कार्यरत: रायमोहा एमएसईबी) यांना सतत शिवीगाळ का करतोस या कारणावरून लाकडी दांडके व काठीने बेदम मारहाण करण्यात आली. २६ मे रोजी गावी आले असता त्यांचे साडूभाऊ सुभाष सांगळे, सोमीनाथ तांदळे, दिनकर तांदळे व अंकुश तांदळे यांनी मारहाण केली. हे भांडण त्यांची पत्नी मनिषा हिने सोडवले. त्यानंतर २८ मे रोजी पुन्हा याच चार आरोपींनी जगदीश यांना मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली. बीड ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

धारदार शस्त्र घेऊन तरुणाचा उच्छाद

बीड : केज तालुक्यातील साळेगाव येथे महेश संजय अंधारे या २५ वर्षीय तरुणाने हातात कुकरीसारखे धारदार शस्त्र घेऊन परिसरात प्रचंड दहशत निर्माण केली आहे. त्याचा शस्त्र फिरवतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. महेश अंधारे हा २८ व २९ मे रोजी बस स्टँड आणि गल्लीत शस्त्र दाखवून जाहीर शिवीगाळ करत होता. २९ मे रोजी पहाटे त्याने थेट शेजारी राहणाऱ्या संजय कळसकर यांच्या घरात घुसून शस्त्राचा धाक दाखवल्याने महिला व बालकांमध्ये घबराट पसरली आहे. नागरिकांनी मुले शिकवणीला पाठवणे बंद केले असून, केज पोलिस ठाण्यात संरक्षणाची मागणी केली आहे.

कठाळवाडी शिवारात जुगार अड्ड्यांवर पोलिसांचा छापा

अंमळनेर : पाटोदा तालुक्यातील कठाळवाडी शिवारात पैसे लावून बेकायदेशीर तिर्रट जुगार खेळणाऱ्या आठ जणांवर अंमळनेर पोलिसांनी छापा मारला. नवनियुक्त स.पो.नि. सतीश कोटकर, पो.उ.नि. कृष्णा चव्हाण, योगेश बहिरवाल, श्याम खाडे, भारत राठोड, संतोष कसाब, गणेश गोसावी, दिलीप घोशिर, अशोक वारे व भास्कर खाडे यांच्या पथकाने वाल्मीक कठाळे, लक्ष्मण कठाळे, पोपट काशीद, गोविंद कठाळे, बापू पडघन, रामकिसन निंबाळकर, लहू निंबाळकर व राजू निंबाळकर यांना ताब्यात घेतले. पुढील तपास संदीप सांगळे करत आहेत.

बेलेवाडी ते धलपे वस्ती रस्ता प्रश्नी मंडळ अधिकाऱ्यांकडून स्थळ पाहणी

पाटोदा : पाटोदा तालुक्यातील बेलेवाडी येथील बेलेवाडी ते धलपे वस्ती रस्त्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. धलपे वस्तीवरील नागरिक, विद्यार्थी आणि शेतकऱ्यांना रस्ता नसल्याने त्यांनी तहसीलकडे मागणी केली होती. त्यानुसार तहसीलदार डी.बी. निलावाड यांच्या आदेशावरून मंडळधिकारी राजेंद्र दराडे, राहुल भरणे, शहादेव जाधव यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. केवळ एका शेतकऱ्याने अडचणीची भूमिका घेतलेली आहे. जमीन मोजणी करून हद्द निश्चित करण्याबाबत कळवणार असून शासन नियमानुसार आम्ही रस्ता खुला करून देऊ, असे मंडळ अधिकारी राजेंद्र दराडे यांनी सांगितले.

'ज्ञानासोबतच संस्कारांची सांगड घालणे गरजेचे'

बीड : तंत्रज्ञानाच्या युगात विज्ञान आणि संस्कारांची सांगड घालणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले. गीता कन्या विद्यालयाचे प्राचार्य सुरेश पेशकार यांच्या ३३ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर आयोजित सेवा गौरव सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी सचिव जयदत्त क्षीरसागर, अरुण डाके, ॲड. शेख शाफिक, सखाराम मस्के, डॉ. राजा मचाले, योगेश पवार, मुरलीधर राऊत, मनोज पाठक, अरुण बोंगाणे, अर्जुन बहीरवाळ, अण्णासाहेब थिटे, प्रशांत पौळ, सुनील शिंदे, अंगद दहिफळे, गणेश परदेशी, सुधाकर तांदळे, व्ही. आर. शिंदे, महादेव कसबे, सौरभ पेशकार, सारंग जोशी, श्रीकांत कुलकर्णी, विजय देवमाने, श्रीमती देशमुख, प्रा. श्रीराम जाधव व दादासाहेब गवते उपस्थित होते.

दिवसा उन्हाच्या झळा अन् रात्री अंधाराचा वेढा

माजलगावकर उकाड्याने बेजार; महावितरणच्या कारभाराविरुद्ध संताप

■ कमलेश जाब्रस

माजलगाव, ता. २९ : दुपार होता होता रस्ते सामसूम होतात आणि अंगाची काहिली करणारे उष्ण वारे वाहू लागते. मे महिन्याच्या होरपळणाऱ्या उन्हातून घामाघूम होऊन नागरिक सायंकाळी घरी परततात, तेव्हा पंख्याखाली चार क्षण सुखाचे घालवावेत अशी त्यांची अपेक्षा असते. मात्र, नेमक्या त्याच वेळी महावितरणची बत्ती गुल होते आणि सुरू होतो उकाड्याचा आणखी एक भयानक खेळ! दिवसभर उन्हाचा तीव्र तडाखा आणि रात्रीच्या वेळी महावितरणने दिलेला अंधाराचा शॉक, अशा दुहेरी कात्रीत सध्या माजलगावकर पुरते अडकले आहेत. मे महिन्याच्या अखेरीसही उष्णतेचा कहर कायम असल्याने शहरातील आणि तालुक्यातील नागरिकांचे जनजीवन विस्कळित झाले आहे.

गेल्या काही दिवसांपासून माजलगावच्या तापमानाचा पारा चाळिशी पार करत आहे. त्यामुळे दुपारच्या वेळी मुख्य रस्त्यांवर शुकशुकाट पाहायला मिळतो. या उष्णतेपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी नागरिक थंड पेये, फळांचा रस, लस्सी आणि ताक यांचा आधार घेत आहेत. एकीकडे वाढत्या तापमानामुळे घराघरांमध्ये कूलर, एसी आणि पंखे सतत सुरू असल्याने विजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मात्र, दुसरीकडे महावितरणकडून वारंवार होणारे लोडशेडिंग आणि तांत्रिक बिघाडांमुळे वीजपुरवठा खंडित होत आहे. दिवसासह रात्रीही अचानक वीज गायब होत असल्याने नागरिकांच्या संतापात भर पडत आहे. या परिस्थितीचा सर्वाधिक फटका लहान मुले, वृद्ध आणि रुग्णांना बसत असून, महावितरणने संभाव्य तांत्रिक बिघाड तातडीने दूर करून सुरळीत वीजपुरवठा करावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

(छायाचित्र : चॅट जीपीटी)

उन्हामुळे विविध आजारांचे प्रमाण वाढले

अशक्तपणा, तीव्र डोकेदुखी, उष्माघात आणि डिहायड्रेशन यांसारख्या शारीरिक तक्रारींमध्ये मोठी वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर डॉक्टरांकडून नागरिकांना आवश्यक ती काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. दुपारच्या वेळेत विनाकारण घराबाहेर न पडणे, शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकवण्यासाठी भरपूर पाणी पिणे, घराबाहेर पडताना डोक्यावर कपडा किंवा टोपी वापरणे आणि हलका आहार घेणे अशा महत्त्वपूर्ण सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत.

शेतकरीवर्ग पावसाच्या प्रतीक्षेत

ग्रामीण भागात शेतकरीवर्ग सध्या चातकासारखी पावसाची प्रतीक्षा करत आहे. शेतामध्ये पेरणीपूर्व मशागतीची कामे वेगाने सुरू असली, तरी असह्य उष्णतेमुळे शेतकऱ्यांचे अतोनात हाल होत आहेत. त्यातच अनेक भागांत पाण्याची टंचाई अत्यंत तीव्र झाली असून विहिरी आणि बोअरच्या पाण्याची पातळी झपाट्याने खाली गेली आहे. वाढत्या उकाड्यामुळे कधी एकदा पाऊस पडतो, अशी भावना व्यक्त होत असून सर्वसामान्यांसह शेतकऱ्यांच्या नजरा आता मॉन्सूनकडे लागल्या आहेत.

शहरातील व्यापारी, छोटे उद्योगधंदे, वेल्डिंग व्यावसायिक, पिठाच्या गिरण्या आणि थंड पेय विक्रेते यांनाही वीज खंडित होण्याच्या समस्येचा मोठा आर्थिक फटका बसत आहे. सततच्या खंडित पुरवठ्यामुळे दैनंदिन व्यवसायावर अतिशय वाईट परिणाम होत आहे.
- शेख सलीम, वेल्डिंग कामगार, माजलगाव.

माजलगाव : शुक्रवारी तहसील कार्यालयावर माकपच्या वतीने निदर्शने करताना आंदोलक.

माजलगाव तहसील कार्यालयावर माकपची निदर्शने

माजलगाव, ता. २९ (बातमीदार) : केरळचे माजी मुख्यमंत्री तथा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे (माकप) नेते पिनराई विजयन यांच्या निवासस्थानी ईडीने (अंमलबजावणी संचालनालय) टाकलेल्या धाडीच्या निषेधार्थ माकपच्या वतीने शुक्रवारी (ता. २९) येथील तहसील कार्यालयावर तीव्र निदर्शने करण्यात आली. या आंदोलनाद्वारे केंद्र सरकारच्या हुकूमशाही कारवाईचा निषेध नोंदवण्यात आला.

या आंदोलनात माकपचे तालुका सचिव शिवाजी कुरे, मुसद्दीक बाबा, मोहन जाधव, सुहास झोडगे, बळिराम भुंबे, कृष्णा सोळंके, बंडू गरड, सय्यद रज्जाक, विजय राठोड, उषा औसे, विठ्ठल सक्राते, स्वाती सक्राते, चंद्रकांत गाते आणि रत्नाकर गोळेकर यांसह कार्यकर्ते बहुसंख्येने सहभागी झाले होते.

इंधन दरवाढीविरोधात काँग्रेसचा शहरात एल्गार

पेट्रोल पंपावर नागरिकांना चॉकलेट वाटत अनोखा निषेध, धोरणांना केला विरोध

बीड, ता. २९ (बातमीदार): महागाई वाढविणारे सरकार, हाय हाय... अच्छे दिन कुठे गेले, उत्तर द्या! अशा गगनभेदी घोषणा देत काँग्रेसच्या वतीने इंधन दरवाढीविरोधात आक्रमक आंदोलन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातील पेट्रोल पंपावर इंधन भरण्यासाठी आलेल्या वैतागलेल्या नागरिकांना चॉकलेट भेट देऊन केंद्र सरकारच्या धोरणांचा अनोखा निषेध नोंदवण्यात आला. यानंतर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वाखालील मोर्चा थेट जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. देशात आणि राज्यात १२ वर्षांपासून भाजपची एकहाती सत्ता असूनही महागाईवर कुठलेही नियंत्रण राहिलेले नाही; हे सरकारचे नाकर्तेपण असून जनतेची उघड फसवणूक आहे, असा संताप यावेळी व्यक्त करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोर्चा पोहोचल्यानंतर जोरदार निदर्शने करण्यात आली. या आंदोलनात राहुल सोनवणे यांच्यासह प्रवीणकुमार शेप, बाळासाहेब ठोंबरे, दादासाहेब मुंडे, गणेश राऊत, गणेश बजगुडे, महावीर मस्के, परवेज कुरेशी, मीनाक्षी पांडुळे, दत्ता कांबळे आणि संभाजी जाधव यांसह शेकडो आक्रमक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

बीड : जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा निघाला. यावेळी उपस्थित राहुल सोनवणे, प्रवीणकुमार शेप, बाळासाहेब ठोंबरे, दादासाहेब मुंडे, दादासाहेब बजगुडे आदी. (छायाचित्र : कृष्णा शिंदे)

हायटेक तंत्रज्ञानाची जोड; 'आत्मा'कडून शेतकऱ्यांना प्रशिक्षण

थेट कोल्हापूर, पुणे, हैदराबाद अन् गुजरातला जाण्याची संधी; इतरही सुविधा मिळणार

■ सकाळ वृत्तसेवा

बीड, ता. २९ : काळ्या आईची मनापासून सेवा करणारा बीड जिल्ह्यातील पारंपरिक शेतकरी आता अधिक प्रगत आणि स्मार्ट होणार आहे. शेतातील तेच तेच जुने प्रयोग सोडून आता थेट कोल्हापूरची नैसर्गिक शेती, पुण्याचा उसाचा भरघोस उतार, हैदराबादचे हायटेक ड्रोन तंत्रज्ञान आणि गुजरातची दुग्धक्रांती प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहण्याची आणि शिकण्याची एक अद्भुत संधी बीडच्या शेतकऱ्यांच्या दारात आली आहे. बीड जिल्ह्यातील पारंपरिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन शेतकऱ्यांना समृद्ध करण्यासाठी आत्मा (कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा) बीड आणि महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग पूर्णपणे सज्ज झाला आहे. जिल्ह्यातील शेतकरी बंधू-भगिनींना देशातील व राज्यातील नामांकित कृषी संस्थांमध्ये थेट ऑन-फिल्ड प्रशिक्षण देण्याची मोठी योजना आखण्यात आली आहे. विशेष म्हणजे, या संपूर्ण प्रशिक्षणाचा प्रवास, राहण्याचा आणि जेवणाचा खर्च मार्गदर्शक सूचनेनुसार आत्मा बीड कार्यालयामार्फत केला जाणार असून शेतकऱ्यांसाठी हे सर्व मोफत असेल.

या अंतर्गत सिद्धगिरी कृषी विज्ञान केंद्र, कोल्हापूर येथे ३ दिवसांचे सेंद्रिय व नैसर्गिक शेतीचे प्रशिक्षण मिळेल. वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे येथे ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी ३ दिवसांचे निवासी प्रशिक्षण आहे. यात उसाचे भरघोस उत्पादन व पाणी व्यवस्थापन शिकवले जाईल. हैदराबाद येथे ५ दिवसांचे आधुनिक शेती व ड्रोन तंत्रज्ञानाचे हायटेक प्रशिक्षण दिले जाईल. तर राष्ट्रीय दुग्ध विकास बोर्ड, आनंद, गुजरात येथे दुग्ध व्यवसायाला चालना देण्यासाठी प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण मिळेल. या प्रशिक्षणासाठी नाव नोंदणी सुरू झाली असून आधी येईल त्याला आधी संधी मिळणार आहे.

जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी या सुवर्णसंधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. इच्छुकांनी आपल्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील आत्मा शाखेतील बीटीएम किंवा एटीएम यांच्याशी त्वरित संपर्क साधावा. उपलब्ध निधीनुसार पुढील अभ्यास दौरेही आयोजित केले जातील.
- सुभाष साळवे, प्रकल्प संचालक (आत्मा), बीड.

प्रशिक्षण दौऱ्यांची प्रमुख वैशिष्ट्ये

- **कोल्हापूर (३ दिवस): जमीन व्यवस्थापन, बीजामृत प्रक्रिया, कीडरोग नियंत्रण आणि पशुधनाचे महत्त्व.**
- **पुणे (३ दिवस): उसाचे विक्रमी उत्पादन, खतांचा संतुलित वापर.**
- **हैदराबाद (५ दिवस): आधुनिक शेती, ड्रोन तंत्रज्ञान आणि वनस्पती आरोग्यविषयक उपाययोजना.**
- **गुजरात (आनंद): दूध उत्पादन वाढवणे आणि दुग्धजन्य पदार्थांची विक्री करण्याचे प्रात्यक्षिक.**

नाव नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे

- **या मोफत व विशेष प्रशिक्षणाचा लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी खालील आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करणे अनिवार्य आहे**
- **१) ओळख व पत्त्याचा पुरावा (नोंदणीकृत सरकारी ओळखपत्र) २) ७/१२ उतारा ३) ८-अ उतारा ४) फार्मर आय. डी. ५) बँक पासबुक झेरॉक्स ६) जात प्रमाणपत्र (लागू असल्यास)**

विद्यार्थ्यांसाठी सत्कार समारंभाचे आयोजन

बीड : 'परिवर्तनाचे शिलेदार' संघटनेतर्फे इयत्ता १२ वी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य जिल्हास्तरीय सत्कार समारंभ सोमवार, ८ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बीड येथे आयोजित करण्यात आला आहे. निवडक विद्यार्थ्यांना पुरस्कार व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल. बीड जिल्ह्यातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी ३१ मे २०२६ पर्यंत आपले प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन संस्थापक अध्यक्ष प्रकाश उजगरे यांनी केले आहे. प्रस्तावासोबत विद्यार्थ्यांचे पूर्ण नाव, शाखा, प्राप्त गुण, संपर्क क्रमांक व पासपोर्ट साईज फोटो जोडणे आवश्यक आहे.

बी. जी. अंबिलवादे सोमवारी सेवानिवृत्त होणार

बीड : शासकीय सेवेतील कर्तव्य पार पाडत असतानाच शिक्षणाची जिद्द आणि साहित्याची आवड जोपासत अनेक संकटांवर मात करणाऱ्या बीड जिल्हा माहिती कार्यालयाच्या ज्येष्ठ कर्मचारी बी. जी. अंबिलवादे या ३१ मे २०२६ रोजी शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत. जालना येथून सुरू झालेला त्यांचा हा ३६ वर्षांचा खडतर आणि प्रेरणादायी प्रवास बीड येथे पूर्ण होत आहे. २००६ मध्ये हिंगोली येथे सर्वसाधारण सहाय्यक म्हणून त्यांची पदोन्नती झाली. त्यानंतर २०११ मध्ये जालना आणि २०१७ मध्ये बीड येथे दूरमुद्रकचालक पदावर पदोन्नती होऊन त्यांच्याकडे अतिरिक्त माहिती अधिकारी पदाचा कार्यभार सोपवण्यात आला.

टाकरवण येथे होळकर जन्मोत्सवानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

टाकरवण : राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त टाकरवण येथे जन्मोत्सव समिती व ग्रामस्थांच्या सहभागातून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ३१ मे २०२६ रोजी सकाळी ८ वाजता प्रतिमेचे पूजन व अभिवादन सोहळा होईल. त्यानंतर सकाळी ९.३० वाजता वृक्षारोपण, सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत भव्य रक्तदान शिबिर आणि सायंकाळी ७ वाजता सत्कार सोहळा पार पडेल. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात टाकरवण ग्रामपंचायतीने तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल ग्रामपंचायत पदाधिकारी, अधिकारी व गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

पंजाब नैशनल बँक (भारत सरकारचा उपक्रम) pnb punjab national bank (A Govt. of India Undertaking)

एआरएमबी, नाशिक
शॉप नं.2 व 3 मेझनाईन मजला, स्नेह हाईट अपार्टमेंट, इंदिरा नगर, नाशिक - 422009. फोन : 0253- 2323020, ईमेल- cs8288@pnb.bank.in

सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 8 व 9 अन्वये तमाम लोकांकरीता ई-लिलाव विक्री नोटीस

स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री करण्याकरीता ई-लिलाव विक्री नोटीस
(सरफेसी कायदा, 2002 मधील नियम 8(6) अन्वये वैधानिक विक्री नोटीस)

सेक्युरिआयझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट ॲन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट ॲक्ट 2002 कलम 13 (4) अंतर्गत मधील नियम 8(6), सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या अन्वये स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री ई- लिलाव पध्दतीने करण्या संदर्भात

तमाम लोकांस व विशेषतः कर्जदार व हमीदार ज्यांचे वर्णन खालील तक्तामध्ये केले आहे त्यांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद स्थावर/ अस्थावर मिळकती ज्या सेक्युअर्ड क्रेडीटर यांचेकडे गहाण / ताब्यामध्ये आहेत, ज्याचा रचनात्मक / प्रत्यक्ष / प्रतिकात्मक ताबा अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर यांनी घेतला आहे. अधिकृत अधिकारी, त्यांची विक्री **"जसे आहे तसे", "जिथे आहे तिथे" व "जशी आहे" त्या स्थितीत" खालील तारखेस** कर्जदार/ गहाणदार / हमीदार यांचेकडून देय रक्कम वसूल करण्याकरीता, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर, यांचेव्दारे करण्यात येणार आहे. राखीव किंमत व अनामत रक्कम व स्थावर मिळकतीचे किमान वर्णन व त्यावर असलेला बोजा (काही असल्यास) यांची माहिती खालीलप्रमाणे

लॉट क्र.	शाखेचे नाव खात्याचे नाव कर्जदार / जामीनदाराचे नाव आणि पत्ता	मिळकतीचे वर्णन आणि कर्जदार / गहाणदार यांची नावे	अ) मागणी सूचनाकलम १३(२) प्रमाणे दिनांक ब) थकबाकी रक्कम दि. ३१.०३.२०२६ रोजी क) ताबा दिनांक कलम १३(४) सरफेसी कलम २००२ प्रमाणे अ) ताबा प्रकार सांकेतिक / प्रत्यक्ष /रचनात्मक	अ) अनामत रक्कम (रु. लाख) ब) ईएमडी (ईएमडी जमा करण्याची शेवटची तारीख) क) बोली वाढीव रक्कम	लिलावाचे दिनांक व वेळ	कर्जदारांच्या बोझाचा तपशील
१	**शाखा- पीएनबी - घोगरगाव (३७५७००) कर्जदार - मे. गोविंद गार्डन मंगल कार्यालय प्रोप्रा. सुरेखा हनुमंत जंजिरे** पत्ता - धनगरवाडी (पिंपळा), गट नं. ३९, धानोरा रोड, धनगरवाडी (पिंपळा) ता. आष्टी, जि. बीड- ४१४२०२ **तसेच राहणार** मु. कसारी, पो. कडा कारखाना, ता. आष्टी, जि. बीड- ४१४ २०३ **तसेच राहणार** गट नं. ३९, धानोरा रोड, धनगरवाडी (पिंपळा), ता. आष्टी, जि. बीड - ४१४२०२ **तसेच राहणार** फ्लॅट नं. डी-२, ५०२, पाचवा मजला, वेरावे अपार्टमेंट, सर्व्हे नं. ११४/३/२, वकाड, ता. मुळशी, जि. पुणे - ४११०५७ **जामीनदार - हनुमंत साहेबराव जंजिरे** मु. कसारी, पो. कडा कारखाना, ता. आष्टी, जि. बीड- ४१४ २०३ **तसेच राहणार** गट नं. ३९, धानोरा रोड, धनगरवाडी (पिंपळा), ता. आष्टी, जि. बीड - ४१४२०२ **तसेच राहणार** फ्लॅट नं. डी-२, ५०२, पाचवा मजला, वेरावे अपार्टमेंट, सर्व्हे नं. ११४/३/२, वकाड, ता. मुळशी, जि. पुणे - ४११०५७	अकृषीक जमीन गट नं. ३९, क्षेत्रफळ ० हे. ४० आर, मुल्यांकन रु. १२.५३ पैसे, धानोरा रोड, धनगरवाडी (पिंपळा), ता. आष्टी, जि. बीड **मालमत्ता मालकी हक्क - श्रीमती सुरेखा हनुमंत जंजिरे चतुःर्सिमा पुर्व -** रावसाहेब देवराव झांबरे यांची जमीन **पश्चिम -** संजय झांबरे यांची जमीन **उत्तर -** संग्राम झांबरे यांची जमीन **दक्षिण -** लोणी - धानोरा रस्ता **मालमत्ता आयडी - PUNB000828800196**	अ) ०२.०२.२०२२ ब) रु. ७७,७८,२३४.८७ + इतर व्याज क) ०८.०७.२०२२ ड) सांकेतिक ताबा	अ) रु. ७९.३५ लाख ब) रु. ७.९३५ लाख (१६.०६.२०२६) क) रु. १.०० लाख	दि. १६.०६.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत	माहित नाही

विक्री ही सेक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या विहित केलेल्या अटी व शर्ती खालील प्रमाणे
1. मालमत्तेची विक्री जशी आहे तशी आणि जशी आहे तशी आणि जे काही आहे ते आहे वर विक्री केली जात आहे.
2. खाली नमूद सुरक्षीत मालमत्तेची माहिती ही अधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहितीनुसार नमूद केली आहे, परंतू अधिकृत अधिकारी हे त्यामध्ये असलेल्या कोणत्याही तृटीस, चुकीची माहितीस वा काही चुकल्यास उत्तर देण्यास जबाबदार राहणार नाहीत.
3. सदर विक्री ही दिनांक, **16.06.2026** @ सकाळी 11.00 ते संध्या. 4.00 वर **https://baanknet.com** वेबसाईटवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मव्दारे खाली दिलेल्या स्वाक्षरीकर्ताव्दारे केली जाईल
4. ई-लिलावात सहभागी होण्यासाठी बोलीदाराने राखीव किंमतीपेक्षा किमान एक बोली अनिवार्यपणे सादर करणे आवश्यक आहे.
5. विक्रीच्या तपशीलावर अटी व नियमांसाठी कृपया **www.pnb.bank.in.** आणि **https://baanknet.com** ही वेबसाईट पाहावी

दिनांक - ३०.०५.२०२६
स्थळ - नाशिक

स्वाक्षरी/-
श्री. सजील कुमार
मुख्य व्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी,
पंजाब नॅशनल बँक, (सिक्युअर्ड क्रेडिटर)

टीप : स्वैर भाषांतर; तफावत आढळल्यास मूळ इंग्रजी मजकूर ग्राह्य